जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 MAY 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिनानिमित्त छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह मान्यवर अधिकारी.

# शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस साजरा झाला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. यावेळी संगीत आणि नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींसह सामूहिक राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत तसेच विद्यापीठ गीत गायन केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

03 MAY 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यात विविध कार्यक्रमांनी महाराष्ट्र दिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात विविध शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय संघटनांमार्फत महाराष्ट्र आणि कामगार दिन १ मे रोजी उत्साहात विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

**विद्यापीठ हायस्कूल :** मुख्याध्यापक तसेच विद्यापीठ ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य बी.डी. गोसावी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आल. ए.पी. साळोखे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी उपमुख्याध्यापिका एस.व्ही. रणनवरे, उपप्राचार्या के.व्ही. भानुसे, एस.आर. सांगले, एम.व्ही. कुंभार उपस्थित होते.

**ताराराणी विद्यापीठ :** ताराराणी विद्यापीठाचे सचिव प्राजक्त पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष डॉ. एस.एन. पवार यांच्यासह शाखाप्रमुख, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**गोखले कॉलेज :** गोपाळकृष्ण गोखले कॉलेजमध्ये प्राचार्य डॉ. आर.बी. भुयेकर यांनी ध्वजारोहण केले. यावेळी सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई, चेअरमन प्रा. डॉ. मंजिरी मोरे, पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई, उपप्राचार्य एन.टी. पाटील, पर्यवेक्षक एस.एन. मोरे, जिमखाना प्रमुख प्रा. डॉ. डी.के. नरके उपस्थित होते.

**नूतन आदर्श विद्यालय :** येथील नूतन आदर्श विद्यालय तसेच विकास विद्यामंदिर येथे अनुपमा कांबळे यांच्या हस्ते ध्वजारोहणाने महाराष्ट्र व कामगार दिन साजरा झाला. मुख्याध्यापिका कुसुम भोसले अध्यक्षस्थानी होत्या. विकास विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिका इंदिरा कांबळे तसेच ज्ञानदीप अकॅडमीचे संचालक प्रा. नारायण निळपणकर उपस्थित होते. तानाजी कवडे यांनी प्रास्तविक केले. एमसीसी पथकाची प्रमुख फिजा खान हिने स्वागत केले. कालिदास कोळी यांनी संविधानाच्या प्रस्ताविकेचे वचन केले. वैभव प्रधान यांनी सूत्रसंचालन केले.

**मुस्लिम बोर्डिंग :** नेहरु स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये कसाब मसजिदचे अध्यक्ष फुरकान चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. चेअरमन गणी आजरेकर अध्यक्ष होते. यावेळी इलाई बांगी, परवेज पैलवान, बापू मुल्ला, हुसेन सनदी, रहिमबक्ष खाटीक, हाजी चांद जत्राटे, उपाध्यक्ष आदिल फरास, प्रशासक कादर मलबारी, रफिक शेख, रफिक मुल्ला, लियाकत मुजावर, जहांगरी अत्तार, पापाभाई बागवान, अल्ताफ झांजी, फारुख पटवेगार, मलिक बागवान, मुख्याध्यापक ताशिलदार एम.एम उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी महाराष्ट्र दिनानिमित्त कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.

**जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण**

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभ झाला. यावेळी अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कसबा बावड्यातील मध्यवर्ती प्रशासकीय इमारत परिसरामध्ये कागल राधानगरी उपविभागाचे प्रांताधिकारी प्रसाद चौगुले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

**विद्यापीठात महाराष्ट्र दिन**

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ.सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ.महादेव देशमुख, बॅ.बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ.धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ.शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ.रामचंद्र पवार, डॉ.तानाजी चौगुले उपस्थित होते.

**बालसंकुलात महाराष्ट्र दिन**

**कोल्हापूर :** येथील जिल्हा परिविक्षा व अनुरक्षण संघटना बालकल्याण संकुलात राज्य स्थापना दिवस १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे विश्वस्त कॅप्टन उत्तम पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

यावेळी मानद कार्यवाह पद्मजा तिवले, जिल्हा परिविक्षा अधिकारी अतिश शिंदे, अधीक्षक एस. एस. गोजारे, आरती पिंगळे, परिविक्षा अधिकारी सागर डवरी, अधीक्षक पी. के. डवरी, सचिन माने, द्रौपदी पाटील, नजिर नदाफ, टी. एम. कदम, अश्विनी आवळे, मीना कालकुंद्र उपस्थित होते.

**महापालिकेत ध्वजारोहण**

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे चौकात प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे, उपायुक्त पंडित पाटील, कपिल जगताप, सहायक आयुक्त उज्ज्वला शिंदे, संजय सरनाईक, स्वाती दुधाणे, मुख्य लेखा परीक्षक कलावती मिसाळ, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAY 2025
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात गुरुवारी महाराष्ट्र राज्याचा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ठीक ८ वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, विद्यार्थी विकास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAY 2025
लोकमत

# विद्यापीठात तुकडोजी महाराज, बसवेश्वर जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. शरद बनसोडे, शरण साहित्य अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी, अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी, संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक, डॉ. सोमनाथ पवार, डॉ. प्रकाश मुंज, डॉ. संतोष कोळेकर, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर आदींसह विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

03 MAY 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात एकाच वेळी चार पुस्तिका प्रकाशित

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : संस्थेचे महत्त्व वाढवणारे उपक्रम निश्चितच महत्त्वाचे असतात. त्या अनुषंगाने सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राने प्रकाशित केलेल्या चार पुस्तिकांचे महत्त्व अधोरेखित करावे लागेल, असे मत कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र आयोजित पुस्तिका प्रकाशन समारंभात ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. रणधीर शिंदे लिखित 'महाराष्ट्रातील समाज परिवर्तन व वाङ्मय', किशोर बेडकिहाळ लिखित 'महात्मा गांधींचा सामाजिक समावेशनाचा दृष्टिकोन', डॉ. कैलास बवले लिखित 'उच्च संस्थांमधील ग्रामीण विकासाचा दृष्टिकोन', आणि डॉ. विनोद पवार लिखित 'भारतीय संविधान आणि अल्पसंख्याकांचे हक्क' या पुस्तकांचे त्यांचे हस्ते प्रकाशन झाले.



कोल्हापूर : सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या पुस्तक प्रकाशनप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. रणधीर शिंदे, किशोर बेडकिहाळ, डॉ. कैलास बवले आणि डॉ. विनोद पवार .

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र विद्यापीठास समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत असून, या पुस्तिकांच्या माध्यमातून सामाजिक विचार बांधून ठेवण्याचे महत्त्वाचे काम घडून आले आहे.' बेडकिहाळ, डॉ. शिंदे, डॉ. बवले, डॉ. पवार यांनी मनोगतातून पुस्तकाची भूमिका विषद केली. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एस. डी. पवार, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, सुरेश खांडेकर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. सूत्रसंचालन अविनाश भाले यांनी केले. शिवाजी युनिव्हर्सिटी प्रेसने पुस्तिकांचे प्रकाशन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 MAY 2025
लोकमत

# सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी विद्यापीठाचा पुरुष संघ जाहीर

**कोल्हापूर :** आंध्र प्रदेश, नेल्लूर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा पुरुष गटाचा संघ जाहीर झाला. ४ ते ८ मे या कालावधीत ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या संघात एकूण १६ खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. संघामध्ये आकाश कदम, (कर्णधार )विक्रांत माने, ऋषिकेश संपकाळ, आदित्य राज पाटील, रोहन बाबर, वैभव गाडे, अनिकेत गुजले, रोहन डोंगळे, ऋतिक पाटील, अतितोष मिश्रा, सुशांत वाघमारे, प्रथमेश गोरे, प्रज्वल पाटील, योगेश कुराडे, ऋतुराज पाटील, पृथ्वी अर्जुन तसेच प्रशिक्षक सुहास वाघ व संघ व्यवस्थापक प्रा. सचिन पाटील यांची निवड झाली.